**MHAU050005382023**

नियमित दिवाणी दावा क्र.९४/२०२३
सुमनबाई त्रीभुवन +१ विरुध्द जिजाबाई त्रीभुवन +४

## नि.क्र.५ – मनाई हुकूमाच्या अर्जावरील आदेश

प्रस्तुत दावा वाटप करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादींनी दाव्याचा निकाल लागेपर्यंत वाद मिळकती त्रयस्थ इसमांना विक्री करु नये किंवा कुठल्याही प्रकारचे हस्तांतरण करु नये याकरिता वादीने निशाणी क्र.५ वर प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी विरुध्द तात्पुरत्या मनाई हुकूम मिळणेकामी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र.१५ वर सादर केले आहे. प्रतिवादींनी वादींची आई छबुबाई मयत गोविंद सोनवणे यांची पत्नी नसुन ती श्री. पावलस सगळगिळे रा. टाकळी मिया ता. राहुरी याची पत्नी असुन वादी श्री. पावलस व छबुबाई यांच्या मुली आहेत. त्यांचा प्रतिवादींच्या कुटुंबाशी काहीही संबंध नाही त्यामुळे एकत्र कुटुंबाच्या मिळकतीमध्ये वाटप मिळण्यासाठी त्या पात्र नाहीत. वादींना वाटप मागता येणार नाही असा बचाव घेतला आहे.

३. वादीचे विधीज्ञ श्री.पी.एम. चंदने आणि प्रतिवादींचे विधीज्ञ श्री. जे.डी. हरीदास यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज आणि अभिलेखावरील कागदपत्रे तसेच युक्तीवाद विचारात घेता, खालील प्रश्न माझ्या विचारार्थी निघालेले असुन, सदर प्रश्नांवर

स्पष्टीकरण देवुन मी उत्तरे नोंदवित आहे.

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १. | वादींच्या लाभात प्रथमदर्शनी केस आहे काय ? | होय |
| २. | न्यायाचा तराजु कोणाच्या बाजुने झुकतो आहे काय ? | वादींच्या |
| ३. | तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास कोणाचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे ? | वादींचे |
| ४. | आदेश काय ? | मनाई हुकूमाचा अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्र.१ ते ३ करीता–**

४. वादींनी मौजे डोणगाव मधील गट क्र.११९ आणि मौजे बाबतारा येथील गट क्र.२४ चे ७/१२ उतारे आणि इतर फेरफार उतारे दाखल केलेले आहेत. सोबतच वादींचे आधारकार्ड देखील आहे. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद आणि दाखल कागदपत्रांवरुन वादी प्रतिवादींचे एकमेकांविषयी नातेसंबंध कशाप्रकारे आहेत याविषयी तर्क काढण्यासाठी मदत होते.

५. प्रतिवादी क्र.२ सोपान गोविंद सोनवणे यांनी त्यांचे वडील गोविंद सोनवणे दि.२४.०९.२०१० रोजी मयत झाल्यानंतर वारसाच्या नोंदी होण्यासाठी तहसिल कार्यालय मध्ये अर्ज देउन वादी क्र.१ व २ यांच्यासह इतर प्रतिवादींची नावे गट क्र.२४ च्या ७/१२

उता–यात लावण्यासाठी अर्ज केला होता. हा अर्ज दाखल केल्यानंतर झालेला फेरफार उतारा वादींनी कागदपत्रांची यादी नि.क्र.३ अ.क्र.५ वर दाखल केली आहे. प्रतिवादींची ही कृती वादींना बहिणी म्हणुन मान्यता देणारी आहे. यावरुन प्रतिवादींनी वादींना बहिणी म्हणुन मान्य केले असल्याचे दिसुन येते.

६. वादी क्र.२ हिची लग्नपत्रीका कागदपत्रांची यादी नि.क्र.१९ अ.क्र.१ वर दाखल केलेली आहे. या लग्नपत्रीकेमध्ये वादी क्र.२ संगीता हिच्या वडीलांचे नाव गोविंदराव विश्राम सोनवणे रा. डोणगाव असे नमुद केलेले आहे. तसेच वादींची आई छबुबाई हिचे मृत्युप्रमाणपत्र, मतदान ओळखपत्रावर देखील नव–याचे नाव गोविंदराव सोनवणे रा. डोणगाव, ता. वैजापुर, जि. औरंगाबाद असेच नमुद केलेले आहे.

७. मयत गोविंद यांना छबुबाई आणि सखुबाई या दोन पत्नी होत्या त्यापैकी पहिली पत्नी कोणती आणि तिच्या अपत्यांना मिळकतीमध्ये किती हिस्सा मिळेल याविषयी दावा चालल्यानंतर निर्णय होईल परंतु सदयपरिस्थितीमध्ये मयत गोविंदच्या सर्व वारसांचा हक्कसंबंधांचे संरक्षण झाले पाहिजे. उपरोक्त कागदोपत्री पुराव्याच्या आधारे वादींची आई छबुबाई मयत गोविंदराव यांची पत्नी असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

८. याउलट प्रतिवादींनी जो बचाव घेतला आहे त्या अनुषंगाने वादींची आई छबुबाई ही श्री.पावलस सगळगिळे रा. टाकळी मिया, ता.राहुरी याची पत्नी होती याबददल कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. प्रतिवादींपैकी सोपान याने मात्र वडील गोविंद मयत झाल्यानंतर वादींच्या नावे वारसाचा फेर व्हावा म्हणुन प्रयत्न केले असल्याचे दिसुन येते. यावरुन प्रतिवादींनी वादींचे अस्तित्व आणि त्यांचा वारसाहक्क मान्य केला

असल्याचे दिसुन येते.

९. उपरोक्त बाबी प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्याआधारे दिसत असल्या तरी दावा निकाली निघण्यास अजुन बराच अवधी शिल्लक आहे. तोपर्यंत वाद मिळकतीचे हस्तांतरण थांबविणे आवश्यक आहे. यदाकदाचित मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचे हक्कसंबंध तयार झाले तर प्रकरणात अनावश्यक गुंतागुंत, क्लिष्टता निर्माण होईल आणि दावा निकाली काढण्यास जास्त कालावधी लागेल. यामुळे प्रस्तुत दावा निकाली निघेपर्यंत वादींना मनाई हुकुमाची आवश्यकता दिसुन येते. वरील सर्व गोष्टी पाहता मी प्रश्न क्र.१ ते ३ चे उत्तरे वादींच्या हक्कात देउन प्रश्न क्र.४ करिता खालील आदेश करत आहे.

## आदेश

१. वादींचा तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी किंवा त्यांच्या वतीने कोणीही दावा मिळकती गट क्र.११९ आणि गट क्र.२४ ची विक्री, गहाण, तारण, बक्षीस किंवा कोणत्याही अन्य मार्गाने दाव्याचा निकाल लागेपर्यंत कोणासही हस्तांतरित करु नये.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PISAL DHANANJAY SHRIRAM
Date: 2024.04.16 17:39:57 +0530

दिनांकः– १६.०४.२०२४

डी.एस. पिसाळ
सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर,
वैजापूर

## **C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Varsha Ajit Andurkar,<br>Stenographer, Gr.-II |
| Court | : | Shri. D. S. Pisal<br>Jt.C.J.J.D. Vaijapur |
| Order Date | : | 16-04-2024 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 16-04-2024 |
| Order uploaded on | : | 16-04-2024 |